माहिती व जनसंपर्क विभागाचे सचिव/ प्रधान सचिव यांना कार्यालयीन कामकाजाकरिता स्वतंत्र नवीन वाहन खरेदी करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क विभाग
शासन निर्णय क्र.मावज २०२६/प्र.क्र.६५/मावज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १० ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :-१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र: संकीर्ण १११०९/प्र.क्र.३३८/०९/१९-अ, दिनांक २७.०९.२०११.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण ३५३२६/प्र.क्र.१२५/आस्था-२, दिनांक ०९.०७.२०२६
३) संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र. वाहन / शासन निर्णय सुधारणाबाबत/का-१/२०२५-२६/८६, दि. ०४.०२.२०२६ व दि.२३.०७.२०२६,
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन २०२५/प्र.क्र.१९/विनियम, दिनांक १७.०९.२०२५
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मावज-२०२६/प्र.क्र.८९/मावज-१, दिनांक ०२.०७.२०२६

प्रस्तावना :-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत मुख्यालय व अधिनस्त कार्यालयांच्या आस्थापनेवरील वाहनांचा आढावा सा.प्र.वि. शासन निर्णय दिनांक २७/०९/२०११ अन्वये सामान्य प्रशासन विभागाच्या एकत्रित आढाव्यामध्ये मंजूर करण्यात आलेला आहे. या आढाव्यानुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालय व अधिनस्त कार्यालयांसाठी एकूण १२२ वाहने मंजूर करण्यात आली आहेत. आता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने उक्त संदर्भाधीन ३ येथील पत्रानुसार प्रधान सचिव (मावज) व महासंचालक (मावज) यांच्याकरीता वाहन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वाहन क्र. MH- ०१-AN-०७५१ (होंडा सिटी) बदली प्रधान सचिव यांच्यासाठी नवीन वाहन खरेदी करण्याची बाब विभागाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या वाहन आढावा समितीने खालील अटीच्या अधीन राहून प्रधान सचिव यांच्यासाठी MH- ०१-AN-०७५१ (होंडा सिटी) या वाहनाच्या बदली नवीन वाहन खरेदी करण्यास मंजूरी दिली आहे.

अ) प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क यांचे वापरातील एमएच-०१-एन-०७५१ या वाहनावर दुरुस्तीकरिता अधिक प्रमाणात खर्च होत असल्याने सदर वाहन विहित नियमाच्या आधारे निर्लेखित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने वित्त विभाग शासन निर्णय दि.१७.०९.२०२५ नुसार नवीन वाहन खरेदी करावे.

ब) सदरची वाहन खरेदी करण्यास उक्त संदर्भ क्र.४ येथील वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १७.०९.२०२५ मधील तरतुदीनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभाग म्हणून असलेल्या अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे.

क) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या खरेदीबाबतच्या विहित कार्यपध्दतीनुसार व तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या स्तरावर करण्यात यावी.

०२. या वाहन खरेदीसाठी येणारा खर्च उक्त संदर्भ क्र.५, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०७.२०२६ अन्वये पुर्नविनियोजनाने उपलब्ध झालेल्या निधीमधून सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.६,२२२०-माहिती व प्रसिद्धी, ०१, चित्रपट, ००१, संचालन व प्रशासन, (००)(०१) प्रसिद्धी संचालक(अनिवार्य) लेखाशिर्ष क्र. २२२०००४३ मधील ५१- मोटार वाहने या उद्दीष्टांमधून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

०३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ ई-ऑफिस Note क्र. १० व १३, दिनांक ०४.०८.२०२६ अन्वये दिलेल्या मंजूरीच्या अधीन राहून दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८१०१५०००३८०३८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F7CCDB18D954BB814D3CC3C92AB0C128E19F5F95C724ABAF0A38FA1A74DEC734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.08.10 15:33:27 +05'30'

(युवराज सोरेगांवकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (मा. व ज.) माहिती जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
२. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई-४०००२०,
३. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
४. उपसंचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई-४०००३२,
५. उप संचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
६. अवर सचिव (कार्यासन आ.पु.क), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२,
७. निवड नस्ती (मावज-२).